अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 15 ऑक्टोबर 2026 | वर्ष 12 वे | अंक 10 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## पत्नीवर प्राणघातक हल्ला करणारा आरोपी २२ वर्षानंतर जेरबंद

**आरोपीला नागपूरातून अटक**

ब्रह्मपुरी/का.प्र.

पत्नीवर प्राणघातक हल्ला करून तब्बल २२ वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या कुख्यात फरार आरोपी अखेर ब्रह्मपुरी पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. रमेश झिंगूजी खानोरकर (रा. कूर्झा, हल्ली मुक्काम नरसाळा, जि. नागपूर) असे या जेरबंद केलेल्या आरोपीचे नाव आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ नाव आणि ओळख लपवून लपतछपत जगणाऱ्या या



आरोपीला नागपुरातून शिताफीने अटक करण्यात आली आहे.

सन २००४ मध्ये ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन अंतर्गत पत्नीवर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी कलम ३०७, ३२६ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गंभीर गुन्ह्यानंतर आरोपी रमेश खानोरकर हा तेव्हापासूनच फरार झाला होता. न्यायालयानेही त्याला फरार घोषित केले होते. ब्रह्मपुरी पोलीस गेल्या २२ वर्षांपासून सातत्याने त्याचा शोध घेत होते, मात्र तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता.

नुकतीच ब्रह्मपुरी पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून महत्त्वाची माहिती मिळाली की, नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील मौजा नरसाळा येथे मागील काही वर्षांपासून एक इसम एकटाच राहत आहे, ज्याच्याकडे कोणतीही नातेवाईक येत-जात नाही. या माहितीच्या आधारे ब्रह्मपुरी पोलिसांनी अत्यंत गुप्त व हुशारीने पडताळणी केली. तपासणीअंती हा इसम इतर कोणी नसून २२ वर्षांपूर्वी पत्नीला संपवण्याचा प्रयत्न करणारा फरारी आरोपी रमेश खानोरकरच असल्याची खात्री पटली. गेल्या २२ वर्षांपासून तो आपली खरी ओळख लपवून नागपूर जिल्ह्यातील कन्हान परिसरातील नरसाळा येथे वास्तव्यास होता.

आरोपीला पोलिसांच्या हालचालींचा सुगावा लागू नये म्हणून अत्यंत खबरदारी बाळगत काल दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी ब्रह्मपुरी पोलिसांनी नरसाळा येथील त्याच्या वास्तव्याच्या ठिकाणी अचूक सापळा रचून अचानक छापा टाकला आणि त्यास ताब्यात घेतले. कसून चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्यास तात्काळ अटक केली असून, पुढील कायदेशीर तपास सुरू आहे. ही धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी साहील झरकर आणि पोलीस निरीक्षक कांचन पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सा.पो.नि. मनोज खडसे, पो.हवा. मुनेश गजबे, मिलिंद नैताम, पोलीस अंमलदार प्रवीण भिवगडे, इर्शाद खान, निलेश तुमसरे, स्वप्नील पळसपगार आणि वशिष्ठ रंगारी यांच्या पथकाने पार पाडली.

******

## ब्रम्हपुरीत ‘रंगीलो रास २०२६- सीझन ४’ चा दिमाखदार प्रारंभ

### गरबाप्रेमींसाठी नऊ दिवसांची सांस्कृतिक पर्वणी!



ब्रम्हपुरी/का.प्र.

सार्वजनिक नवरात्र उत्सव समिती, ब्रम्हपुरीच्या वतीने आयोजित 'Rangilo Raas 2026 - Season 4' या भव्य गरबा महोत्सवाचा उद्घाटन सोहळा रविवारी (११ ऑक्टोबर) अत्यंत उत्साहपूर्ण, भव्य आणि नयनरम्य वातावरणात पार पडला. आकर्षक आयोजन, विद्युत रोषणाई आणि सांस्कृतिक उत्साहाचा अनोखा संगम साधणाऱ्या या महोत्सवाने ब्रम्हपुरी शहरात नवरात्रोत्सवाची रंगत द्विगुणीत केली असून, संपूर्ण शहरात आनंदाचे उधाण आले आहे.

या दिमाखदार महोत्सवाचे उद्घाटन ब्रम्हपुरीतील प्रतिष्ठित उद्योगपती निलेश मोहता आणि नगरपरिषदेचे माजी नगरसेवक गौरव भैय्या यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष कृष्णा सहारे हे होते, तर नगरपरिषदेचे माजी सभापती विलास विखार यांची प्रमुख उपस्थिती या सोहळ्याला लाभली.

याप्रसंगी नगरसेवक मनोज भूपाल, नगरपरिषदेचे माजी उपाध्यक्ष सतीश कावळे, सिद्धेश्वर भरें, सुरेश दर्वे, प्रशांत ताम्हण, रवी रणदिवे, अक्षय चहांदे, गणेश पिल्लारे, प्रशिक कामडी, सागर हर्षे, सुशील थारकर, शुभम राऊत, चिंतामण जोशी, विवेक गरफडे आणि माशुरकर यांच्यासह शहरातील अनेक गणमान्य व्यक्तींची उपस्थिती लक्षवेधी ठरली. उपस्थितांनी आयोजकांच्या उत्कृष्ट नियोजनाचे मनमोकळेपणाने कौतुक केले.

‘रंगीलो रास २०२६’ च्या माध्यमातून ११ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत सलग नऊ दिवस गरबाप्रेमींना नृत्याची पर्वणी मिळणार आहे. दररोज सायंकाळी ७ वाजल्यापासून पारंपरिक गरबा नृत्य, सुरांचा तालावर थिरकणारे तरुण-तरुणी आणि भक्तीमय वातावरणामुळे ब्रम्हपुरीचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत आहे. विशेष म्हणजे, येत्या गुरुवारी (१५ ऑक्टोबर) विशेष 'गरबा ग्रुप स्पर्धेचे' भव्य आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमुळे स्थानिक कलाकारांना व गरबाप्रेमींना आपले नृत्यकौशल्य सादर करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

सार्वजनिक नवरात्र उत्सव समितीचे हे आयोजन केवळ नृत्यापुरते मर्यादित नसून पारंपरिक गरबा नृत्य, संगीत आणि सांस्कृतिक एकतेचा एक सुंदर संगम ठरत आहे. युवा पिढीसह सर्व धर्मीय-सर्व वयोगटातील नागरिकांसाठी हा उत्सव अत्यंत उल्हासदायी आणि मनोरंजनाची पर्वणी ठरत आहे. या सर्वसमावेशक व भव्य उपक्रमात सर्व ब्रम्हपुरीकर नागरिकांनी, युवक-युवतींनी आणि गरबाप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन नवरात्रोत्सवाचा नितांत आनंद लुटावा, असे आपुलकीचे आवाहन सार्वजनिक नवरात्र उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. आयोजकांच्या या स्तुत्य आणि भव्य प्रयत्नांमुळे ब्रम्हपुरीच्या सांस्कृतिक वैभवात नक्कीच भर पडली आहे!

**पाणी अडवा, पाणी जिरवा...**



## संपादकीय...

# विद्यार्थ्यांसमोर सरकार पुन्हा झुकले!

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा रेटा वाढल्यानंतर सरकारला जाग आली आणि आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत पदापासून दूर राहण्याची वेळ आली. विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित केले; पण सरकारच्या आश्वासनांचा हिशेब आता जनतेसमोर मांडला जाईल. आंदोलन थांबले म्हणजे प्रश्न संपले, असे सरकारने समजू नये ! एमपीएससी ही महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या स्वप्नांची संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून गुणवत्तेच्या जोरावर प्रशासकीय सेवेत दाखल होण्याची संधी मिळते. गरीब शेतकऱ्याचा मुलगा असो, कष्टकरी कुटुंबातील मुलगी असो किंवा ग्रामीण भागातून शहरात येऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करणारा तरुण असो, प्रत्येकाला एकच विश्वास असतो की अभ्यास केला, मेहनत घेतली तर यश मिळू शकते. हा विश्वासच जर डळमळीत झाला, तर तरुणांनी नेमके कोणाकडे पाहायचे? परीक्षेतील कथित गैरप्रकारांमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे आयोगाने दिली पाहिजेत.

आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाने अखेर सरकारला चर्चेच्या टेबलावर आणले. सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन सरकारची भूमिका मांडली. पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीसाठी माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती नेमण्यात आली. या समितीत तुकाराम मुंढे, माजी न्यायमूर्ती पी.डी. नाईक, पोलिस महानिरीक्षक लखमी गौतम आणि सेवानिवृत्त अधिकारी गणेश पाटील यांचा समावेश आहे. समितीला ६० दिवसांत अहवाल सादर करायचा आहे. आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनीही चौकशी पूर्ण होईपर्यंत पदापासून दूर राहण्याची भूमिका जाहीर केली. पण एवढ्याने न्याय मिळाला असे म्हणता येणार नाही. चौकशी समिती नेमणे सोपे असते; सत्य बाहेर काढणे कठीण असते. समितीने नेमके काय शोधायचे, कुणाची जबाबदारी निश्चित करायची आणि दोषींवर कोणती कारवाई करायची, याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. आयोगाच्या आजी-माजी अध्यक्षांपासून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांपर्यंत चौकशी होणार असे सांगितले जाते. मग चौकशीच्या कक्षेतून कुणालाही वगळले जाणार नाही, याची हमी कोण देणार? पद मोठे असले म्हणून कुणाला अभय मिळता कामा नये. दोषी कोणताही असो, त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा समितीचा अहवाल म्हणजे सरकारी कपाटात धूळ खात पडणारा आणखी एक कागद ठरेल!

विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मागण्या या केवळ आंदोलनापुरत्या मर्यादित नाहीत. तीन वर्षांत ७० हजार रिक्त पदे भरण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. २०२७मधील गट-क पदांची संख्या वाढविणे, तहसीलदार भरतीतील पदवाटपाचे प्रमाण ६०:४० ऐवजी ५०:५० करणे, आयोगाची सदस्यसंख्या ११ पर्यंत वाढविणे, एमपीएससीच्या सर्व परीक्षा ऑफलाइन घेणे आणि पोलीस भरतीसाठी एकच अभ्यासक्रम ठेवणे, अशा मागण्यांवर सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. या घोषणा ऐकायला चांगल्या आहेत. पण महाराष्ट्रात घोषणांची कमतरता कधीच नव्हती. कमतरता आहे ती घोषणांची अंमलबजावणी करण्याची! सत्तर हजार पदे तीन वर्षांत भरायची असतील, तर त्यासाठी आजपासूनच ठोस नियोजन करावे लागेल. कोणत्या विभागात किती पदे रिक्त आहेत, कोणत्या वर्षी किती भरती होणार, परीक्षा कधी होणार आणि नियुक्तिपत्रे कधी मिळणार, याचे वेळापत्रक जाहीर केले पाहिजे. भरतीच्या जाहिराती निघतात, परीक्षा पुढे ढकलल्या जातात, निकाल रखडतात आणि नियुक्त्या न्यायालयीन प्रक्रियेत अडकतात, हे चक्र थांबले पाहिजे. वयोमर्यादा संपण्याची भीती मनात ठेवून अभ्यास करणाऱ्या तरुणांना आणखी किती काळ अनिश्चिततेच्या गर्तेत ठेवणार? सरकारने दिलेले आश्वासन हे विद्यार्थ्यांवर उपकार नाहीत; ती सरकारची जबाबदारी आहे. एमपीएससीच्या सर्व परीक्षा ऑफलाइन घेण्याची मागणी मान्य करण्याबाबतही सरकारने केवळ घोषणेवर न थांबता परीक्षेची सुरक्षितता सुनिश्चित केली पाहिजे.

# बालाजी राईस प्रॉडक्ट्स व रामदेवबाबा साल्वंटला ने.हि. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट




ब्रह्मपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी कनिष्ठ व उच्च महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथील इयत्ता १२ वी MCVC च्या विद्यार्थ्यांनी बालाजी राईस प्रोडक्ट्स प्रा. लि. तसेच रामदेवबाबा सॉल्वेंट्स, ब्रह्मपुरी येथे दि. ०८ ऑक्टोबरला शैक्षणिक व औद्योगिक भेट देत प्रत्यक्ष उद्योगविश्वाचा अनुभव घेतला.

विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील संकल्पना प्रत्यक्ष औद्योगिक प्रक्रियेशी जोडता याव्यात, उद्योगांमध्ये कच्च्या मालापासून तयार उत्पादनापर्यंतची प्रक्रिया कशी पार पडते, यंत्रसामग्रीचा वापर, उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग, साठवणूक तसेच उद्योगातील विविध विभागांचे कार्य याबाबत प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

बालाजी राईस प्रोडक्ट्स प्रा. लि. येथे विद्यार्थ्यांनी तांदूळ प्रक्रिया व उत्पादनाशी संबंधित विविध टप्प्यांची माहिती घेतली. त्याचप्रमाणे रामदेवबाबा सॉल्वेंट्स येथे सॉल्व्हेंट उद्योगाची कार्यपद्धती, उत्पादन प्रक्रिया, औद्योगिक यंत्रसामग्री, सुरक्षितता उपाययोजना आणि उद्योग व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन मिळाले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी उद्योगातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून विविध प्रश्नांची उत्तरे जाणून घेतली. पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक ज्ञानात भर पडली असून भविष्यातील करिअरच्या दृष्टीनेही या भेटीचा मोठा उपयोग होणार आहे, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाज समजून घेण्याची तसेच रोजगार व व्यवसायाच्या विविध संधींची माहिती मिळाली. यावेळी प्रा. रोहित रमाकांत अरगेलवार आणि प्राध्या. कु. सुरभी वसंता मारभते यांनी महाविद्यालयाच्या वतीने संबंधित उद्योग व्यवस्थापनाचे आभार मानण्यात आले.

# घरासमोर पार्क केलेल्या दोन दुचाकींची धाडसी चोरी

ब्रम्हपुरी / का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात अवैध धंद्यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होत आहे. शहरात तसेच ग्रामीण भागात अज्ञात चोरट्यांनी आपले पाय पसरल्यामुळे नागरिकांना आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत फिर्यादी अमित विठ्ठल नक्षीने (वय २६ वर्षे, रा. सोनेगाव, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर) यांचे चिंचोली फाट्यावर सलूनचे दुकान आहे. फिर्यादी अमित नक्षीने यांनी दैनंदिन कामाकरिता बजाज कंपनीची पल्सर २२० मोटरसायकल (क्र. एमएच ३४ सीयू ४९७५) जानेवारी २०२६ मध्ये बजाज शोरूम, ब्रम्हपुरी येथून फायनान्सवर १ लाख ६१ हजार रुपयांना विकत घेतली होती. ते तिचा वापर सलून दुकानात ये-जा करण्यासाठी करत असत. दिनांक ८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी फिर्यादी आपले सलूनचे दुकान बंद करून घरी गेले. जेवण करून रात्री ११ वाजताच्या सुमारास त्यांनी रोडवरील आपली दुचाकी घरच्या अंगणात हँडल लॉक न करताच ठेवली आणि गाडीची चाबी घरात नेऊन ठेवून अंदाजे रात्री ११:३० वाजता झोपी गेले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी झोपेतून उठल्यावर त्यांना अंगणात ठेवलेली मोटरसायकल दिसून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची तक्रार फिर्यादी अमित नक्षीने यांनी ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात दिली.

दुसऱ्या घटनेत, फिर्यादी राखी सचिन मेश्राम (वय ४० वर्षे, रा. भगतसिंग पेठ वॉर्ड, ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर) यांनी आपल्या भावाला कामाला जाण्याकरिता हिरो मोटोकॉर्पची काळ्या रंगाची स्पेंडर मोटरसायकल (क्र. एमएच ३४ सीव्ही ६१६८, अंदाजे किंमत ७७,६०३ रुपये) स्वत:च्या नावावर विकत घेतली होती. फिर्यादीचा भाऊ कामावर जाताना स्वत: दुचाकी चालवून घेऊन जात असे आणि रात्री परत आल्यावर ती घरासमोरील अंगणात लावून लॉक करून चावी फिर्यादीकडे देत असे.

दिनांक १० ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११:०० ते १२:०० वाजेच्या दरम्यान फिर्यादी राखी मेश्राम यांची दुचाकी अंगणात नेहमीप्रमाणे उभी होती. नंतर रात्री अंदाजे १:०० वाजेच्या दरम्यान त्यांना जाग आल्यावर त्यांनी घराबाहेर जाऊन पाहिले असता दुचाकी दिसून आली नाही. त्यांनी आजूबाजूला पाहणी केली, परंतु ती कुठेही आढळली नाही. दुचाकीचे हँडल लॉक तोडून ती चोरून नेल्याची तक्रार फिर्यादी राखी मेश्राम यांनी ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात दिली आहे.

## विनोदिनी

एक बार लड़का अपनी घरवाली को लाने ससुराल गया ...
वहाँ उसे अपने ससुर के पास सोना पड़ा....
उसको रात को चूड़ियाँ बजने की आवाज़ सुनाई पड़ी...
उसे लगा कि उसकी घरवाली इशारा कर रही है... तो उसने उचक कर देखा पर वहाँ कोई नही था... तो वो वापस सो गया ...
दोबारा कुछ देर बाद फिर वही आवाज़ आई...
फिर उचक के देखा...पर कोई नहीं था... उसकी यह हरकत देख पास सोया ससुर बोला... 'सोजा बावले... भैंस की संकल बज रही है...!!!'

# डॉ. प्रकाश वट्टी यांना गोंडवाना विद्यापीठाचा रासेयो कार्यक्रमाधिकारी पुरस्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

वृक्षारोपण, रक्तदान, स्वच्छता मोहीम आणि सामाजिक जनजागृती अशा विविध उपक्रमांतून गेल्या १२ वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जपणारे ब्रम्हपुरी येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश वट्टी यांना गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या वतीने यंदाचा उत्कृष्ट रासेयो कार्यक्रमाधिकारी पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याची दखल घेत विद्यापीठाने १५ व्या वर्धापन दिनानिमित्त गौरव केला.



यावेळी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, लक्ष्मीनारायण अभिमत विद्यापीठ नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अतूल वैद्य, गोंडवाना विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ. नविन मुंगळे, कुलसचिव अनिल हिरेखण, रासेयो संचालक डॉ. श्याम खंडारे यांच्या उपस्थित सन्मानित करण्यात आले.

डॉ. वट्टी यांनी महाविद्यालयासह रासेयोच्या दत्तक गावात विविध रचनात्मक व विधायक उपक्रम राबविले आहेत. पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने त्यांनी आतापर्यंत सुमारे दोन हजार वृक्षांची लागवड केली आहे. तसेच १५ रक्तदान शिबिरांचे आयोजन करून सुमारे एक हजार गरजू रुग्णांना रक्तदानाच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यात योगदान दिले आहे. ब्रम्हपुरी शहरातील रेल्वेस्थानक, बस आगार, ग्रामीण रुग्णालय, बोंडेगाव तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांवर स्वच्छता मोहीम राबवून त्यांनी प्लास्टिक निर्मूलनासाठी पुढाकार घेतला. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्यासोबतच पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे कामही त्यांनी केले.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या काळात पथनाट्यांच्या माध्यमातून मतदार जागृती अभियान राबवून मतदानाचे महत्त्व आणि मतदारांची जबाबदारी नागरिकांना पटवून दिली. कोल्हापूर आणि भामरागड येथील पूरग्रस्तांसाठी अन्नधान्य व आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. याशिवाय विविध साथीच्या आजारांविषयी जनजागृती आणि एड्स प्रतिबंधक जागृती अभियान प्रभावीपणे राबविण्यातही त्यांनी योगदान दिले.

त्यांच्या या गौरवामुळे शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचेही कौतुक होत आहे. ने. भै. हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया, गौरवजी भैया, माजी प्राचार्य डॉ. एन.एस. कोकोडे, डॉ. डी.एच. गहाणे तथा प्राध्यापकवृंदांनी त्यांचे अभिनंदन केले.

# योगेश ढोरे ग्रा.पं. कामगार सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी

देसाईगंज/का.प्र.

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेना (नोंदणी क्रमांक ५८२५) च्या




वतीने चामोर्शी येथील बालाजी सभागृहात एका भव्य राज्यस्तरीय कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या महत्त्वपूर्ण मेळाव्यात गडचिरोली जिल्ह्याची नवीन प्रभावी आणि लढाऊ कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यात कामगारांच्या हक्कासाठी आणि न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने आक्रमक भूमिका घेणारे सावंगी येथील योगेश ढोरे यांच्या शिरावर जिल्हाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

या सोहळ्यास संघटनेचे राज्याध्यक्ष विलासभाऊ कुमरवार, राज्य संघटक जनार्धनजी मुळे, राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश दिवटे, पुणे विभागीय अध्यक्ष सुरेश हिंगे, नागपूर विभागीय अध्यक्ष ठाकूरदास गव्हारे आदींच्या प्रमुख उपस्थितीत ही नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या, हक्क आणि न्याय्य अधिकारांसाठी योगेश ढोरे यांच्या नेतृत्वाखाली हा लढा अधिक तीव्र होईल आणि कामगारांच्या आशा–आकांक्षांना नक्कीच नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. ढोरे यांच्या रूपाने कामगारांना न्याय मिळवून देणारा खमका नेता लाभल्याने संपूर्ण जिल्ह्यातील ग्रामपंचायत कामगारांमध्ये आनंदाची व उत्साहाची लाट उसळली आहे.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत ख्रिस्तानंदच्या मिताक्षीचे यश




ब्रम्हपुरी/का.प्र.

सातवी राज्यस्तरीय खुली कराटे स्पर्धा एस. के.कराटे क्लब बुटीबोरी जिल्हा नागपूर येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेमध्ये ब्रह्मपुरी येथील ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथील पहिल्या वर्गाची विद्यार्थिनी मीताक्षी सचिन सोरते हिने सहा वर्षाखालील तसेच १५ ते २० किलो वजन गटातील कराटे स्पर्धेत नेत्र दीपक कामगिरी करून दोन सुवर्णपदक पटकाविले.

सदर स्पर्धेसाठी राज्यभरातून विविध स्पर्धक उपस्थित झालेले होते. ब्रह्मपुरीतील एकमेव चिमुरडीने दोन सुवर्णपदक व प्रशस्तीपत्र पटकाविल्याबद्दल तिचे परिसरात सर्वत्र कौतुक केले जात आहे. तिच्या यशाबद्दल विद्यालयाचे व्यवस्थापक फादर शिबू एमडी, विद्यालयाचे मुख्याध्यापक फादर बिनु थॉमस, उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली यांनी कौतुक केलेले आहे.

# थंड पाण्याची पाणपोई सुरू करा

## मानव सेवा बहु. सोसायटीतर्फे नगराध्यक्ष मिसार यांना निवेदन



ब्रह्मपुरी/का.प्र.

कडक उन्हाळ्यात शहरातील नागरिकांना, प्रवाशांना आणि वाटेकरूंना शुद्ध व थंड पिण्याचे पाणी सहज उपलब्ध व्हावे, या उदात्त हेतूने 'मानव सेवा बहुउद्देशीय सोसायटी, ब्रह्मपुरी'च्या वतीने एक महत्त्वाची आणि कौतुकास्पद पहल हाती घेण्यात आली आहे. यासंदर्भात १२ ऑक्टोबर २०२६ रोजी ब्रह्मपुरीचे नगराध्यक्ष योगेश मिसार यांना अधिकृत निवेदन सादर करण्यात आले.

विशेष म्हणजे, केवळ पाणपोई सुरू करणेच नव्हे, तर तिच्या नियमित साफसफाईची, देखभालीची आणि संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी मानव सेवा सोसायटीने स्वतःच्या खांद्यावर घेतली आहे. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत नागरिकांची होणारी गैरसोय दूर होऊन सर्वांना निरंतर स्वच्छ व थंड पाण्याची सोय उपलब्ध होणार आहे.

यावेळी अध्यक्ष निखिल अनवाणी, उपाध्यक्ष शब्बीर अली जेसानी, सचिव रूपेश चांडक, कोषाध्यक्ष निलेश जिवानी आणि सहसचिव निलेश आष्टेकर उपस्थित होते. तसेच, सदस्य अभिषेक मणिहार, इरशाद शेख, सचिन चुर्रे आणि उत्पल नागदेवते यांनीही या सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

# मराठी भाषा सप्ताहनिमित्य प्रबोधन कार्यक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा परिषद माजी शासकीय हायस्कुल ब्रम्हपुरी येथे अभिजात मराठी भाषा सप्ताहनिमित्त प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रसंगी अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पवन रामटेके सर, प्रमुख मार्गदर्शक शहारे मॅडम, सुरपाम सर, प्रमुख अतिथी नरेश रामटेके सर, नानाजी रामटेके सर, स्मिता राठोड मॅडम उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मराठी भाषा इतिहास मराठी भाषेविषयी अभिमान, प्रेम व अभिजात मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मराठी भाषा, साहित्य, संत परंपरा, व्याकरण, इतिहास तसेच मराठी भाषेच्या अभिजात दर्जाशी संबंधित विविध प्रश्न विचारण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रश्नांची उत्तरे दिली.

# पितृमोक्ष अमावस्येला सावंगीत सव्वाशे वर्षापासून चालत आलेली मकराच्या बैलांची मिरवणूक

देसाईगंज/का.प्र.

देसाईगंज तालुक्यातील सावंगी येथील बुल्ले कुटुंबीय दरवर्षी पितृमोक्ष अमावस्येच्या दिवशी मकराच्या बैलांची मिरवणूक काढण्याची परंपरा जोपासत आहेत. या परंपरेला सव्वाशे वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटला आहे. पूर्वजांनी सुरू केलेल्या या परंपरेला तडा जाऊ न देता, यंदाही बुल्ले कुटुंबीयांनी आपल्या पूर्वजांच्या स्मरणार्थ या बैलांच्या मिरवणुकीचे आयोजन केले होते. सर्वपित्री अमावस्येच्या दिवशी विविध धार्मिक



कार्यक्रमांचे आयोजन केले.

हिंदू धर्मात पितृमोक्ष अमावस्येला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सर्वपित्री अमावस्येला पितृपक्षाची समाप्ती होते. पितृपक्षात आपल्या पितरांचे श्राद्ध करण्याची पद्धत आहे; ज्यामुळे पितरांचे आशीर्वाद मिळतात आणि पितृदोष दूर होतो. त्यामुळे बुल्ले कुटुंबीयांच्या पूर्वजांनी पुढाकार घेत पितृमोक्ष अमावस्येच्या दिवशी मकराच्या लाकडी बैलांची मिरवणूक काढण्याची परंपरा सुरू केली. त्या काळात अभंग, भजन, कीर्तन, गोपाळकाला आणि महाप्रसादाची सोय बुल्ले कुटुंबीयांकडून केली जात असे. मकराच्या बैलांची ही मिरवणूक रात्रभर चाले. त्या वेळी आकाशात पेटते आकाशकंदील (दुबारे) सोडले जात आणि आतषबाजी केली जात असे. आजोबांनी सुरू केलेली ही परंपरा त्यांच्या पुढील पिढीने आणि वारसांनी अविरत सुरू ठेवली आहे. त्यामुळे तीन पिढ्यांची ही परंपरा आजही कायम असल्याची माहिती माधवजी बुल्ले यांनी दिली.

पूर्वजांनी सुरू केलेली परंपरा जपत बुल्ले कुटुंबीयांनी या वर्षीही दिनांक १० ऑक्टोंबरला घरासमोरील आवारात भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या मिरवणुकीत गावातील असंख्य महिला व पुरुष उपस्थित राहून, बुल्ले कुटुंबीयांच्या वतीने ग्रामस्थांना महाप्रसादाचे वाटप केले. सव्वाशे वर्षांपासून सुरू असलेली ही मिरवणुकीची परंपरा माधवजी बुल्ले, घनश्यामजी बुल्ले, प्रभाकरजी बुल्ले व त्यांचे कुटुंबीय यांनी निष्ठेने जपली आहे.

# ने.हि. विद्यालयात स्व. मदनगोपालजी भैया जयंती

ब्रह्मपुरी/का.प्र.

नेवजाबाई भैया शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व. मदनगोपालजी भैया यांच्या जयंतीनिमित्त नेवजाबाई हितकारिणी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. मदनगोपालजी भैया यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक के.एम. नाईक, उपमुख्याध्यापक ए.डब्ल्यू. नाकाडे, पर्यवेक्षक पी.आर. जिभकाटे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी मुख्याध्यापक नाईक यांनी स्व. मदनगोपालजी भैया यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. ते दानशूर, शिक्षणप्रेमी व सेवाभावी व्यक्तिमत्त्व होते. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संपर्कात आल्यानंतर त्यांनी आपली संपत्ती सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यासाठी समर्पित केली. ब्रह्मपुरी येथे नेवजाबाई हितकारिणी विद्यालयाच्या उभारणीसाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचे सेवाकार्य व दातृत्व आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# कर्मयोगी मदनगोपालजी भैयांचा दातृत्व वारसा प्रेरणादायी - अशोक भैया



ब्रह्मपुरी/का.प्र.

'ब्रह्मपुरीला शैक्षणिक नगरी किंवा शिक्षणाची पंढरी म्हणून ओळख निर्माण करण्याचे कार्य नेवजाबाई हितकारिणी शिक्षण संस्थेने केले. ही संस्था वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रेरणेने व कर्मयोगी मदनगोपालजी भैयांच्या दातृत्वातून निर्माण झाली आहे. या संस्थेचे अनेक विद्यार्थी घडविले, अनेकांचे संसार उभे केले. सर्व क्षेत्रात या संस्थेचे विद्यार्थी देशात, परदेशात आज सेवारत आहेत. या संस्थेचे माजी अध्यक्ष कर्मयोगी मदनगोपालजी भैयांनी सर्व शक्तीनिशी हा सुसज्य परिसर निर्माण केला आहे. त्यांचा दातृत्वाचा वारसा प्रेरणादायी आहे' असे विचार संस्था सचिव अशोक भैयांनी व्यक्त केले. ते कर्मयोगी मदनगोपालजी भैयांच्या जयंतिनिमित्त बोलत होते.

याप्रसंगी सर्वप्रथम अशोक भैया व प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले.

# रणमोचन येथे विदर्भस्तरीय खंजिरी भजन स्पर्धा संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी व विदर्भ स्तरीय भजन स्पर्धा चे




आयोजन रणमोचन येथे करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटक नानाजी तुपट अध्यक्ष सेवा सह संस्था किन्ही होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रमोद चिमुरकर माजी जि.प. सदस्य, डॉ. गोकुळदास बालपांडे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, दलीत मित्र माजी प्राचार्य डी. के. मेश्राम, पत्रकार गोवर्धन दोनाडकर, योगेश ढोरे, लिचडे सर, बाळकृष्ण ठाकरे सर, मुख्याध्यापक आंबोरकर सर, लांजेवार सर, पांडुरंगजी प्रधान, विश्वनाथजी तोंडरे, बोधे सर, उत्तम बगमारे खरकाळा, रणदिवे सर, कीर्तनकार ह.भ.प. कविताताई चांदेकर, सोमेश्वर उपासे, डॉ . सोमनकर मॅडम, सरपंच निलिमा राऊत, उपसरपंच सदाशिव ठाकरे, किशोर कार, घ्यार साहेब, धोटे साहेब, ग्रामपंचायत सदस्य संजय प्रधान, घनश्याम मेश्राम, सोमेश्वर पोटेकर, विनोद दोनाडकर, विलास मेश्राम, राजीव प्रधान, लक्ष्मी दोनाडकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

ब्रह्मलीन वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा विदर्भ स्तरीय भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला भरपूर प्रतिसाद मिळाला. स्पर्धा दोन दिवस चालली. त्यामुळे गावात आनंदमय वातावरण निर्माण झाला होता. भजन स्पर्धेमध्ये पुरुष गटातून प्रथम क्रमांक अखिल भारतीय भजन मंडळ हिरापूर तर द्वितीय क्रमांक श्री गुरुदेव सेवा मंडळ विहीरगाव, तृतीय क्रमांक वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजन मंडळ फुटाळा, चतुर्थ क्रमांक श्री गुरुदेव सेवा मंडळ बेंबाळ, पाचवे क्रमांक सप्तसूर भजन मंडळ सोनुली तर महिला गटातून प्रथम क्रमांक सावित्री भजन मंडळ डोंगरगाव, द्वितीय क्रमांक स्वर साधना महिला भजन मंडळ नागाळा, तृतीय क्रमांक गुरुबाबा महिला भजन मंडळ आवळगाव व चतुर्थ क्रमांकावर रेणुका माता महिला भजन मंडळ निफन्द्रा, पाचवा क्रमांक जय कोकणाई महिला भजन मंडळ कवठा यांनी प्राप्त केले.

कार्यक्रमाचे संचालन सुनील नाकतोडे तर आभार प्रदर्शन घनश्याम दोनाडकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता श्री गुरुदेव सेवा मंडळ रणमोचन(नवीन वस्ती) पदाधिकारी कार्यकर्ते व समस्त गावकऱ्यांनी सहकार्य केले.

## जगदिश मेहेर यांना राज्यस्तरीय सेवाभावी पुरस्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

समर्थ बहुउद्देशीय प्रतिष्ठान, चिखली बुलढाणा यांच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा राज्यस्तरीय सेवाभावी पुरस्कार सोहळा संतनगरी, शेगाव येथे मान्यवरांच्या हस्ते देऊन ब्रम्हपुरी येथील शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल जगदीश जयवंत मेहेर यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुरस्कारात शाल, सन्मानचिन्ह, प्रशस्ती पत्र, भेट वस्तू देण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल जगदीश मेहेर यांचे त्यांचे मित्रमंडळींसह सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांची फुटबॉल स्पर्धेत जिल्हा तथा विभागीय स्तरावर भरारी





ब्रम्हपुरी/का.प्र.

क्रिडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा परिषद चंद्रपुर द्वारा आयोजित तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी फुटबॉल स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये १४ वर्षाखालील मुले विभागीय स्तरावर व १७ वर्षाखालील मुलांची जिल्हास्तरावर निवड करण्यात आली.

१४ वर्षाखालील मुलांच्या गटात चैतन्य डहारे, युवराज चेरकुरवार, परीस परशुरामकर, राघव जाणी, विवांक हाडगे, अक्ष वानखेडे, अनन्य नंदेश्वर, सानिध्य लांजेवार, अद्विक धवस, इशान नाकाडे, नक्ष रामटेके, यथार्थ ठेंगरे, कलश प्रधान, प्रज्वल शिवनकर, अशा एकुण १५ विद्यार्थ्यांचा फुटबॉल स्पर्धेत विभागीय स्तराकरीता पात्र ठरलेले आहेत. तसेच १७ वर्षाखालील मुले फुटबॉल स्पर्धेत युगांत वासनिक, प्रज्वल शिवनकर, अर्थव रणदिवे, ओजस तलमले, सुबोध वंजारी, मयंक वाकोडीकर, मिहिर पिसे, चिराग सोनकुसरे, प्रबुद्ध मालके, जीत बांते, मोहित अलोने, युवी शिवनकर, सार्थक दोनाडकर, रिशांत रामटेके, लाभ ढोरे, गणेश दिवटे, सर्वेश ठवरे या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड करण्यात आली.

विभागीय तसेच जिल्हास्तरासाठी पात्र ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी, उपप्राचार्या, पर्यवेक्षिका तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचा गौरव करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ने.हि. कन्या विद्यालयात विद्यार्थी सुरक्षा आणि जागरूकता अभियान

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय, ब्रह्मपुरी येथे दिनांक १० ऑक्टोबर २०२६ रोज शनिवारला विद्यार्थी पोलीस अंमलदार मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शिका सुमित्रा साखरकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



सुरक्षा समिती अंतर्गत विद्यार्थिनींमध्ये जागरूकता व्हावी यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम तसेच प्रमुख मार्गदर्शिका सुमित्रा साखरकर मॅडम पोलीस उपनिरीक्षक ब्रह्मपुरी, प्रमुख अतिथी कल्पना गेडाम मॅडम समाजसेविका, शिवणकर सर पोलीस अंमलदार, लोणबले सर पोलीस हवालदार, ठाकूर सर करताना पोक्सो कायदा, महिला अत्याचार विरोधी कायदा, मानसिक आरोग्य याबद्दल माहिती दिली. तसेच गेडाम मॅडम यांनी गुड टच आणि बॅड टच याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लोनबले सर यांनी सायबर क्राईम याबद्दल माहिती दिली. तसेच मुख्याध्यापक निखारे सर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मोबाईलचे दुष्परिणाम सांगितले. कार्यक्रमाचे संचालन दहिवले मॅडम यांनी तर उपस्थितांचे आभार धांडे मॅडम यांनी मानले.

❀❀❀❀❀❀

# स्पर्धा परिक्षा पुस्तक वाटप व व्यसनमुक्ती कार्यक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

प्राचार्य डॉ. संजय प्रभाकरराव हर्षे यांनी मानवकुटी जीवन संशोधन केंद्रामार्फत दान स्वरूपात २ ऑक्टोंबर गांधी जयंती सप्ताहाच्या अवचीत्य साधुन ब्रम्हपुरी येथील अनुदानीत माध्यमिक व उच्चमाध्यमिक आश्रम शाळा ब्रम्हपुरी येथील १२ वी च्या मुला मुलींना स्पर्धा पुस्तकांचे वाटप दि. ०५/१०/२०२६ ला करून समाजात समाजसेवेचे आदर्श घडवुन दिले.

या कार्यक्रमाचे मुख्य अतिथि पर्वनी पाटील उपविभागीय दंडाधिकारी, ब्रम्हपुरी व डॉ. माधुरी सलामे मुख्याधिकारी नगर परिषद ब्रम्हपुरी, तसेच अध्यक्ष देवीदासजी जगनाडे माजी प्राचार्य व कै. विठोबाजी आमले आदिवासी शिक्षण संस्था ब्रम्हपुरीचे अध्यक्ष रमेशजी आमले यांचे प्रमुख उपस्थितीत व यांचे शुभहस्ते वाटप करण्यात आले. व्यसनमुक्तीचा वाईट परिणाम स्वत: वर आणि परिवारावर व समाजावर कसा होतो यावर सर्व प्रमुख वक्ते यांनी खासकरून प्रकाश टाकला. तर स्पर्धा पुस्तकाचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना शासकीय अधिकारी MPSC व UPSC च्या परिक्षा देवून कसे होता येते. याबद्दल सविस्तर मार्गदर्शन आपल्या भाषणाद्वारे प्रमुख अतिथि व अध्यक्षांनी पटवून दिले.

प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय माजी प्राचार्य डॉ. संजय हर्षे यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा. देशपांडे सर व आभार प्रदर्शन प्रा. धकाते सर यांनी केले.

# निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना वेळेवर अनुदान द्या - प्रा. प्रकाश बगमारे

ब्रह्मपुरी/का.प्र.

राज्यातील निराधार दिव्यांग, विधवा आणि वृद्ध लाभार्थ्यांच्या उदरनिर्वाहाचा महत्त्वाचा आधार असलेल्या संजय गांधी निराधार योजना अनुदानाची रक्कम ब्रह्मपुरी आणि चिमूर विधानसभा क्षेत्रात अनेक ठिकाणी वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. या प्रकरणाची गंभीर दाखल घेत भाजपा नेते प्रा प्रकाश बगमारे यांनी शासनाला अनुदान वेळेवर मिळावा यासाठी विनंती केली आहे.

या योजनेच्या मदतीवर जिल्ह्यातील हजारो गरजू नागरिकांच्या दैनंदिन गरजा, औषधोपचार उदरनिर्वाह अवलंबून असतो. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना मंजूर अनुदान नियमितपणे व निर्धारित वेळेत मिळण्याची व्यवस्था शासनाने करावी अशी ही मागणी प्रा. बगमारे यांनी केली.

# डॉ. मेघनाथ सहा यांची जयंती साजरी



ब्रह्मपुरी/का.प्र.

विदर्भ तेली महासंघ व संताजी बहुद्देशीय सेवा मंडळ शाखा ब्रह्मपुरीच्या वतीने थोर वैज्ञानिक मेघनाथ सहा यांची जयंती साजरी करण्यात आली .याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ मार्गदर्शक कवडूजी मरगडे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रभुदास चिलबुले, प्रा.डॉ. रवींद्र विखार, प्रा. कोमलकांत ठोंबरे, जगदीश मेहेर, यशवंत कामडी, पंढरी पिसे, संजय पिसे, रामकृष्ण कामडी, विनोद वंजारी इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन जगदीश मेहेर तर उपस्थितांचे आभार विनोद वंजारी यांनी मानले.

### ... QUOTES ...

**"You must not lose faith in humanity. Humanity is an ocean; if a few drops of the ocean are dirty, the ocean does not become dirty."** - Mahatma Gandhi

### चारोळी

दवा-दारूच्या ओव्हर डोजमुळे
कधी रिॲक्शन होते...
रिॲक्शनसाठी पुन्हा, दवादारू घ्या,
त्वरीत ॲक्शन होते...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांचा जयंती सोहळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरास ज्याच्या परिसस्पर्शाने 'शिक्षणाचे माहेरघर' म्हणून संपूर्ण विदर्भात







नावलौकीक मिळाला. ज्यांच्या पुण्याईमुळे ही भूमी शिक्षणाच्या ज्ञानगंगेन प्रवाहीत झाली. असे थोर व्यक्तीमत्व कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांची जयंती नेवजाबाई भैया हितकारीणी शिक्षण संस्था ब्रम्हपुरी अंतर्गत एल. एम. बी. पब्लिक स्कूल ब्रम्हपुरी येथे दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी स्कूलच्या प्रांगणात अतिशय मांगल्यपुर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांचा जन्म १० ऑक्टोबर १९०६ ला भंडारा जिल्हातील लांखादुर येथे सर्वसाधारण परिवारात झाला. त्यांनी सामाजिक क्षेत्र व शैक्षणिक क्षेत्रात अहोरात्रपणे काम करून जनमानसाच्या मनात स्वतःची ओळख निर्माण केली. कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून ने. हि. शिक्षण संस्थेचा पाया रचला. हीच संस्था संपूर्ण क्षेत्रात मोठ्या वटवृक्षाखाली रूपांतरीत झाली आहे. ज्यांच्या छायेत लाखो विद्यार्थी शिक्षण रूपी ज्ञानगंगा प्राशन करीत आहेत. याच कारणास्तव दरवर्षी ने.भै.हि. शिक्षणसंस्थेतर्फे मदनगोपालजी भैया यांच्या स्मृतीप्रित्यर्थ 'संस्थापक दिन' दि. १० ऑक्टोंबर रोजी साजरा केला जातो. तळागाळातील लोकांच्या समाजसेवेसाठी केलेल्या योगदानाचा गौरव या कार्यक्रमाद्वारे केला जातो.

स्कुलचे अध्यक्ष अशोक भैया सर, ने. हि. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष स्नेहलताबाई भैया, तसेच ने. हि. शिक्षण संस्थेचे सदस्य गौरव भैया यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. तद्वतच एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका आणि पर्यवेक्षिका यांची उपस्थिती होती. प्रसंगी कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला व त्यांच्या जीवनकार्याचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


# ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी ब्रम्हपुरीत व्याख्यान व गीत गायन

ब्रम्हपुरी/का.प्र.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, ब्रम्हपुरी तर्फे ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा येथील पंचशील एज्युकेशन सोसायटीचे प्रांगणात दिनांक २१ व २२ ऑक्टोबर २०२६ ला आयोजित करण्यात आला आहे.

या निमित्त्याने बुधवार, दिनांक २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता जाहिर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले असून या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून भदंत दिपांकर सुमेधो चेअरमन, बुद्धीस्ट कल्चरल फाऊंडेशन, दिल्ली, मुख्य अतिथी म्हणून चंद्रकांत हांडोरे, माजी मंत्री, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य तथा खासदार (राज्यसभा) दिल्ली तसेच प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ तथा लेखक- विचारवंत, नांदेड हे उपस्थित राहणार आहेत.

तसेच गुरुवार, दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता 'टि सीरीज इंडियन आयडॉल फेम रॉक स्टार' शिवा मोहोड, मुंबई यांचा बुद्ध-भिमगीतांचा संगीतमय प्रबोधनात्मक कार्यक्रम संपन्न होणार असून या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन समिती पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

❀❀❀❀❀❀

# वनहक्क क्षेत्रातील वृक्षलागवडीवरून ग्रामस्थ आक्रमक

**ब्रम्हपुरी/का.प्र.**

**वनहक्क कायदा २००६ अन्वये प्राप्त झालेल्या गवर्ला चक येथील सामूहिक वनहक्क (CFR) क्षेत्रात ग्रामसभेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता बेकायदेशीरपणे सुरू करण्यात आलेल्या वृक्षलागवड कामावरून गवर्ला चक येथील ग्रामस्थ व सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती कमालीची आक्रमक झाली आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी हनुमान मंदिराच्या प्रांगणात विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत प्रशासकीय मनमानीचा तीव्र निषेध नोंदवत सदर काम तात्काळ थांबविण्याचा आणि मांगली ग्रामपंचायतीला 'तिळमात्रही जागा न देण्याचा' एकमुखी निर्णय घेण्यात आला.**

**गवर्ला चक येथील ग्रामस्थांना वनहक्क कायदा २००६ अनुसार सामूहिक वनहक्क प्राप्त झालेले आहेत. असे असतानाही, ब्रम्हपुरीचे गट विकास अधिकारी (BDO) आणि मांगली ग्रामपंचायतीने ग्रामसभेला कोणतीही पूर्वसूचना किंवा परवानगी न देता या संरक्षित CFR क्षेत्रात परस्पर अतिक्रमण करून वृक्षलागवडीचे काम सुरू केले. मांगली ग्रामपंचायतीच्या या मनमानी कारभारामुळे गावाच्या वनहक्कांवर आणि जमिनीच्या अधिकारांवर थेट गदा येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या बेकायदेशीर अतिक्रमणाविरोधात आणि नियमबाह्य कामांविरोधात सामूहिक वनहक्क समिती व ग्रामस्थांच्या वतीने प्रशासनाकडे वारंवार निवेदने देण्यात आली होती. मात्र, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या निवेदनांना सरळ केराची टोपली दाखवल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अखेर आपल्या हक्कांचे व जमिनीचे रक्षण करण्यासाठी गावकऱ्यांना एकत्र येत विशेष ग्रामसभा बोलावावी लागली.**

**पार पडलेल्या या विशेष ग्रामसभेत महिला व पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या सभेत काही महत्त्वाचे निर्णय व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. यात वनहक्क प्राप्त क्षेत्रात पूर्वपरवानगीशिवाय सुरू असलेले वृक्षलागवडीचे काम तात्काळ थांबविण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला. मांगली ग्रामपंचायतीच्या अतिक्रमणाला विरोध करत गावाची एक इंच अथवा तिळमात्रही जागा दिली जाणार नाही, असा ठाम निर्णय घेण्यात आला. सदर ग्रामसभेचा ठराव चंद्रपूरचे जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, BDO ब्रम्हपुरी, पोलीस अधीक्षक (चंद्रपूर) आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (ब्रम्हपुरी) यांना पाठवून कायदेशीर पावले उचलण्याची आणि नियमबाह्य कामे तात्काळ बंद करण्याची मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

**वनहक्क कायदा २००६ ने ग्रामसभेला सर्वोच्च अधिकार दिले आहेत. प्रशासनाने किंवा कोणत्याही ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्या अधिकारांना पायदळी तुडवून केलेले काम पूर्णपणे बेकायदेशीर आहे. आम्ही आमच्या वनहक्कांचे आणि जमिनीचे रक्षण करण्यासाठी शेवटपर्यंत कायदेशीर लढा देऊ असे मत अध्यक्ष/सचिव, सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती, गवर्ला चक यांनी व्यक्त केले.**

**या विशेष ग्रामसभेचे इतिवृत्त व मंजूर ठराव माहिती आणि पुढील कठोर कारवाईसाठी एकात्मिक आदिवासी विकास विभाग कार्यालय (चिमूर) यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येत असून, आता शासन व पोलीस प्रशासन यावर काय कारवाई करते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले**


बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
Lubi PUMPS-MOTORS
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404